## <u>नियमीत दिवाणी मुकदमा नं. २१५/१९९८.</u>

## <u>नि.६२ खालील आदेश</u>

सदरचा अर्ज ति-हाईत इसमातर्फे दाव्यात त्यांना पक्षकार करणेसाठी दाखल केला आहे. अर्जात ति-हाईत इसमाचे कथन की, दावा प्रतिवादी विरुध्द सरस निरस मानाने वाटप व पृथक कब्जासाठी आहे. प्रतिवादी क्र. २ ने दि. २८.८.२०१३ रोजी मौजे चळे येथील मिळकती अर्जदारचे नावे दि. २२.७.२०१३ रोजी मृत्यूपत्राने केल्या आहेत. प्रतिवादी क्र. २ हे दि. २८.८.२०१३ रोजी मयत आहेत. सदर मृत्यूपत्राने त्यांनी त्यांचा अविभक्त हिश्श्याचे मृत्यूपत्र केले आहे. त्यामुळे अर्जदार यास दावा मिळकतीमध्ये हक्क प्राप्त झाला आहे. ही बाब वादीस माहीत असून देखील त्याने अर्जदारना या कामी पक्षकार केले नाही. त्यामुळे या अर्जदारास प्रतिवादी म्हणून सामील करण्याचा हुकूम व्हावा व वादींना त्याबाबत दुरुस्ती करणेस आदेशीत करावे. अर्जदारने त्याचे कथनाचे पुष्टयर्थ नि. ६३ वर प्रतिज्ञापत्र दाखल केले व नि. ६५ चे लिस्टापोटी मृत्यूपत्राची छायांकीत प्रत दाखल केली.

२. वादीने सदर अर्जास नि. ७५ वर म्हणणे देवून अर्ज नाकारला आहे. वादीचे कथन की, अर्जास कोणतेही कारण नाही, अर्ज मुदतीत नाही, अशा प्रकारची विनंती ति-हाईत इसमास करता येणार नाही, प्रतिवादी क्र. २ ने मृत्यूपत्र केले नाही, प्रतिवादी क्र. २ यास अशा प्रकारचे मृत्यूपत्र करण्याचा अधिकार नव्हता, त्यामुळे अर्ज टिकणार नाही, तथाकथित मृत्यूपत्राने अर्जदार मालक होणार नाहीत, त्यांचा दावा मिळकतीशी संबंध नाही, प्रकरण प्रलंबित ठेवण्यासाठी अर्ज आला आहे, अशा प्रकारच्या अर्जाने दाव्याचे

स्वरुपात बदल होवून गुंतागुंत निर्माण होणार आहे, त्यामुळे अर्ज नामंजूर करावा.

३. अर्जाचे तसेच म्हणण्याचे अवलोकन केले. नि. ६५ चे लिस्टापोटी दाखल केलेल्या मृत्यूपत्राचे अवलोकन करता सदर मृत्यूपत्र नोंदणीकृत आहे. ते प्रतिवादी क्र. २ देवई गायकवाड यांनी लिहून ठेवले आहे. ते मोजे चळै येथील शेतजमीन गट क्र.. २७२, २९४अ, २९५अ, २९६, ४०२ बाबत आहे. या मृत्यूपत्राने त्यांनी त्यांचा हिस्सा शशिकांत शिंदे या अर्जदारास काही प्रमाणात दिला आहे. सदर मृत्यूपत्रावरुन सकृतदर्शनी दावा मिळकतमध्ये अर्जदार यांचा हिस्सा असल्याचे आढळून येते. दावा वाटपाचा असल्याने दावा मिळकतीशी निगडीत सर्व पक्षकार दाव्यात असणे गरजेचे आहे. त्यामुळे दाव्याचा गुणावगुणावर निर्णय होण्यास मदत होणार आहे. कारणे अर्जदारचा अर्ज मंजूर करणे न्यायाचे होईल. करीता आदेश -

## **आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादींनी अर्जदार यांना दाव्याचे कामी पक्षकर म्हणून सामील करावे व त्याप्रमाणे दुरुस्ती करुन तजविज करावी.

पंढरपूर. (श्रीमती एस.बी.यादव)
दिनांक ०८.०३.२०१६. सहावे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,पंढरपूर.

**Certificate**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment
a)Name of the Stenographer : A.A.Chavan.

b) Court : 6th Jt. Civil Court, Pandhapur.
c) Judgment/Order signed by PO on : 08.03.2016
d) Judgment/Order uploaded on : 11.03.2016